N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** वैजापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0404 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/07/2025 22:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence. (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 23/07/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 23/07/2025
**Time From (वेळेपासून):** 12:51 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:08 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/07/2025 **Time (वेळ):** 21:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 037
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/07/2025 22:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** डबाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच,बाजुला, वैजापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
   (a) **Name** (नाव): समाधान बाजीराव गोराणे
   (b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
   (c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988
   (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
   (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
   (f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
   **Date of Issue** (दिल्याची तारीख):
   **Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
   (g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नाराळा ता वैजापुर,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नाराळा ता वैजापुर,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

   (i) **Occupation** (व्यवसाय):
   (j) **Phone number** (फोन नं.):
   **Mobile** (मोबाइल नं.): 91-7038419597

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जगदीश गेणुदास गवळी | | | 1. विनायक नगर कलनी गंगापुर रोड,वैजापुर ता वैजापुर,वैजापूर, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(**चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(**रू. मध्ये**)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(**इन्क्वेस्ट अहवाल**/** अकस्मात मृत्यू प्रकरण क्र**.,**जर असल्यास**)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत **):**

मी समाधान बाजीराव गोराणे वय-37 वर्ष, व्यवसाय शेती रा. मु.नाराळा पोस्ट जानेफळ ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 7038419597.
मी दिनांक 22/07/2025 रोजी श्री. धर्मराज बागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे पंचासमक्ष तक्रार दिली की, मी अर्जदार वरिल प्रमाणे असुन राहत्या गावात माझ्या स्वत:च्या मालकीची शेती असुन त्यातील गट क्र.207 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कृषी सिंचन अंतर्गत शेत तळे तयार केले आहे. सदर शेततळ्या करिता मला शासनाकडुन 2,25,000/-रुपये अनुदान मंजुर झाले असुन त्याचे पैसे माझ्या बँक खात्यावर आलेले नाही. मी सदर मंजुर रक्कम बँक खात्यावर का आली नाही याबाबत आमच्या विभागाचे कृषी सहायक श्री. जगदीश गवळी यांना दिनांक 21/07/2025 रोजी मी मोबाईल द्वारे संपर्क साधुन विचारणा केली असता श्री. गवळी यांनी मला सांगितले की, " तुमच्या शेततळ्याची मंजुर बिलाची फाईल वरच्या कार्यालयात पाठवलेली नाही म्हणुन तुमच्या बँक खात्यावर शेततळ्याचे पैसे आलेले नाही. तुम्हाला जर पैसे बँक खात्यावर पाहीजे असतील तर मला पैसे द्यावे लागतील." मी या अगोदर कृषी सहायक जगदीश गवळी यांना शेततळ्याचे प्रस्ताव मंजुर होण्यासाठी 30,000/- रुपये रोख स्वरुपात दिलेले होते तरी देखील त्यांनी अद्याप पावेतो माझे शेततळ्याचे पुर्ण पणे काम न करता अजुन पैशाची मागणी केल्याने मला त्यांना पैसे देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांच्या विरोधात तक्रार देण्यासाठी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे हजर झालो आहे.मी दिनांक 23/07/2025 रोजी कृषी सहायक जगदीश गवळी यांची भेट घेवुन माझ्या शेततळ्याची मंजुर रक्कमेची बिल वरिष्ठ कार्यालयात पाठविण्या करिता चर्चा करणार आहे त्यावेळी त्यांनी माझ्या कडे लाचेची मागणी केल्यास आपण त्यांचे विरोधात कायदेशीर कारवाई करावी.माझ्यात व संबधीत कृषीसेवक जगदीश गवळी यांच्यामध्ये कोणताही आर्थिक व्यवहार नाही. सदर कामा व्यतीरिक्त जे कोणतेही देणे घेणे नाही तसेच कोणत्याही प्रकार वैर किंवा वाद नाही. माझे शिक्षण झाले नसुन मला लिहता वाचता येत नाही.•सदर तक्रार माझ्या सांगण्याप्रमाणे माझा मित्र अशोक निवृत्ती काळे यांचे समक्ष टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविली असता माझ्या सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे." वगैरे अशा मजकुराची तक्रार दिली.
माझे तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक 23/07/2025 रोजी पोनि/बांगर, पोनि/कोरे, पंच व सापळा पथकासह शासकीय वाहणाने वैजापुर येथे आले त्यानंतर श्री. जगदीश गवळी हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला व पंच क्रमांक 1 याच्या करवी लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि/बांगर यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. पोनि/बांगर यांचे सुचनेवरुन पोशि/ हिवाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत अडकवून, चालु करुन मला व पंच क्रमांक-1 यांना कृषी सहायक श्री. जगदीश गवळी यांनी बोलविल्यावरुन वैजापुर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात माझेकडील प्लॅटीना मोटारसायकल क्र. MH-20-DP-6658 सह पोहचलो. मी व पंच क्रमांक -1 असे वैजापुर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात माझी व श्री. जगदीश गवळी यांची भेट होवुन कामासंदर्भाने चर्चा झाली. सदर चर्चेत श्री. जगदीश गवळी हे मला म्हणाले की, तुम्ही सांगा..मी काय आकडा सागु आता..नाही नाही आता ते कसंहे तुम्ही प्रेमाचे माणसं हे..जे तुम्हाला असंन ते..असे बोलले त्यानंतर मी त्यांना नाही नाही असं नाही..आता मनानं कसे देवू असे बोललो त्यानंतर श्री. जगदीश गवळी मला म्हणाले की, आपलं झालं ना बोलणं..तुमचं काय म्हणणं हे मला सांगा.. तुम्हाला काय वाटत तर द्या पाच हजार असे म्हणाल्याने मी त्यांना म्हणालो की देवू पाच हजार ..मंग म्हणुन मी व पंच क्र. 1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत. सदर ठिकाणी ü पोनि/बांगर यांचे सुचनेवरुन पोशि/ हिवाळे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/बांगर, मी, पंच व सापळा पथकतील सदस्याने व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, श्री. जगदीश गवळी यांनी माझ्या कडे शेततळ्याचे मंजुर

रक्कमेचे बिल वरिष्ट कार्यालायात पाठविण्यासाठी 5000/-रुपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोनि/बांगर यांनी मला व दोन्ही पचांना श्री. जगदीश गवळी यांचेविरुध्द लागलीच लाचस्विकृती सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगीतले.पोनि/बांगर यांनी वेळेअभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/बांगर यांनी सापळा कारवाईसाठी ॲथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळविले. त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखविले. तसेच नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. सदर सापळा कारवाईसाठी आवश्यक लाचेची रक्कम मी पोनि/बांगर यांच्या ताब्यात दिली त्यांनी खात्री केली असता त्यामध्ये भारतीय चलनाच्या 500/-रुपये दराच्या एकुण 10 नोटा असे 5000/-रु दिसुन आले. सदर रकमेच्या नोटांचे नंबर व वर्णन पंच क्रमांक-2 यांचे करवी एका कोऱ्या कागदावर नमुद करुन, त्या नोटांना ॲथ्रासिन पावडर लावुन त्या लाच रकमेच्या नोटा माझे पॅंटचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. पोनि/बांगर यांनी मला श्री. जगदीश गवळी यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाच रकमेच्या नोटा 5000/-रु. काढुन श्री. जगदीश गवळी यांना द्याव्यात व त्यानंतर गळयात अडकवलेले पिवळे मोठे उपरणे (गमचा) गळ्यातुन काढुन डाव्या हातात घ्यावा असा इशारा नेमुन दिला.

त्यानंतर पोनि/बांगर यांचे सुचनेवरुन पोशि/हिवाळे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत अडकवून, चालु करुन मला व पंच क्रमांक-1 यांना सोबत घेवुन लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे लाच स्विकृती सापळा कारवाई करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक, वैजापुर येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि/बांगर, पोनि/कोरे,पोह/जोशी पोअं. हिवाळे, चालक पोअ/बागुल पंच क्र. 2 असे शासकीय वाहणाने आले. मी व पंच क्रमांक 1 असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा वैजापुर येथे थांबलेलो असतांना काही वेळात श्री. जगदीश गवळी यांनी मला फोनद्वारे संपर्क करुन श्रीवास्तव उपहार गृह येथे बोलवुन घेतले. मी व पंच क्र. 1 सदर ठिकाणी गेलो असता श्री. गवळी यांची भेट झाली. सदर भेटीत माझ्या आणि श्री. गवळी यांच्या दरम्यान शेत तळ्याच्या मंजुर रकमेचे बिल सादर करण्या बाबत चर्चा झाली. सदर चर्चेत श्री. जगदीश गवळी हे मला म्हणाले की, साहेब लोक बी आपल्या भरोश्यावर सह्या करता, चलायच का मग ते मला ना एक साहेबाला भेटायच आहेते फोन उचलीना, देवुन टाका असे म्हणालेवर मी त्यांचे समोर पाच हजार रूपये धरले असता त्यांनी ते पैसे घेवुन मी त्यांना मोजुन घ्या मोजुन घ्या असे बोललो त्यावर त्यांनी नाही नाही काही हरकत नाही, नाही नाही काही अडचन नाही राहु द्या असे म्हणुन मी पॅंट उजव्या खिश्यातील लाचेची रक्कम उजव्या हाताने काढुन त्यांचे समक्ष धरले असता त्यांनी ती उजवे हाताने स्विकारुन त्यांच्या पॅंटचे उजवे खिशात ठेवली. त्याच वेळी तात्काळ मी लाचस्विकृतीचा पुर्वनियोजीत गळ्यातील उपरणे काढुन डाव्या हातात धरण्याचा ईशारा 16.08,वा. केला. माझा पुर्वनियोजीत ईशारा प्राप्त होताच पोनि/बांगर, पोनि/कोरे, पोह/जोशी, पोअं. हिवाळे, चालक पोअ/बागुल पंच क्र. 2 असे तात्काळ श्रीवास्तव उपहार गृह येथे हजर झाले. पोनि/बांगर यांचे सुचनेवरुन पोशि/ हिवाळे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/बांगर यांनी श्री. जगदीश गवळी यांना ताब्यात घेवून त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/बांगर यांनी पच क्रमांक-1 यांना पंच क्रमांक 2 यांचे समक्ष माझ्या कडे बोट दाखवुन विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्रमाक -1 यांनी सांगितले की, " श्री. जगदीश गवळी यांनी सांगितलेप्रमाणे 5,000/- रूपये लाच रक्कम उजवे हाताने स्विकारुन स्वत:चे अंगावरील पॅंटचे उजवे बाजुचे खिशात ठेवली आहे."

त्यानतर पोनि/बांगर यांनी श्री. जगदीश गवळी यांना त्यांचे नाव, पद व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री. जगदीश गेणुदास गवळी, वय-43 वर्ष, व्यवसाय नोकरी पद-कृषीसहायक, नेमणुक तालुका कृषी अधिकारी कार्यालय वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर रा. विनायक नगर कॉलनी, के.के. सुरासे यांचे मालकीचे घर, गंगापुर रोड, वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3) असे सांगीतले. पोनि/बांगर यांनी श्री. जगदीश गवळी यांना 5000/-रु. लाच रकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी अंगावरील पॅंटचे उजवे बाजुचे खिशात ठेवली आहे असे सांगितले. पोनि/बांगर यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 यांना त्यांचे ताब्यात घेऊन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन येतात का याची खात्री करण्यास सांगितले. सदर वेळी पंच क्र. 2 यांनी त्यांच्या ताब्यातील नोटांची कागदावर नमुद केलेल्या आकड्यावरुन खात्री करुन त्याच लाच रकमेच्या नोटा असल्याचे सांगितले. सदर लाच रकमेच्या नोटा पंच क्र. 2 यांचे ताब्यात ठेवण्यास पोनि/बांगर यांनी सांगितले. पोनि/बांगर यांनी श्री. जगदीश गवळी यांना माझे कामासंदर्भातील कागदपत्राबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांचे सोबत असलेल्या बॅगेमधुन माझ्या कागदपत्रांची फाईल काढून दिली असता ती फाईल पंचा समक्ष जप्त करण्यात आली आहे. त्यानंतर पोनि/बांगर यांनी घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन पुढील कारवाई वैजापुर पोलीस ठाणे येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी, पोनि/बांगर, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही

पंच असे पोलीस ठाणे वैजापुर येथे आलोत. त्याबाबत दिनांक 23/07/2025 रोजी लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा एकत्रीत सविस्तर पंचनामा केला आहे.
त्यानंतर पोनि/बांगर यांनी मला घडलेले घटनेची सर्व हकिगत सविस्तर सांगुन त्याप्रमाणे फिर्याद द्यावी असे सांगीतल्याने मी वरील प्रमाणे घडलेल्या घटनेबाबत पोनि/बांगर याचे समक्ष माझी फिर्याद कथन केली त्यांप्रमाणे टंकलिखीत करण्यात आलेली आहे.
तरी दिनांक 23/07/2025 रोजीचे 12.51 वा. ते दिनांक 23/07/2025 रोजीचे 16.08 वा. दरम्यान माझ्या मालकीच्या शेतीमधील गट नं. 207 मधील तयार केलेल्या शेततळ्याचे मंजुर रकमेचे बिल वरिष्ठ कार्यालयात पाठविण्या करिता कृषी सहायक श्री. जगदीश गवळी यानी माझ्या कडे 5000/- रुपयाची लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम श्रीवास्तव उपहार गृह डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या बाजुला, वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी पंच क्र. 1 समक्ष स्विकारली असुन त्यांना सापळा पथकाने रंगेहात पकडले आहे. सबब माझी श्री. जगदीश गेणुदास गवळी, वय-43 वर्ष, व्यवसाय नोकरी पद-कृषीसहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद संगणकावर माझा मित्र अशोक निवृत्ती काळे यांचे समक्ष टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविली असता माझे सांगणेप्रमाणे ती बरोबर खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Satyajeet Sudhakar Taitwale(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15 Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

निशाणी डाव्या हाताचा अंगठा

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन, वैजापूर
जि छत्रपती संभाजीनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Satyajeet Sudhakar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI